०

अभिलेख पाहीला. अर्ज व कागदपत्रे पाहीली. वादीतर्फे ॲड. एस. एम. देशपांडे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१ ही समन्स नाकारून परस्पर दावा मिळकतीचा व्यवहार करत आहे. त्याबाबत जाहीर प्रगटन व खुलासा नोटीस अभिलेखावर दाखल आहे. सदर दावा वडीलोपार्जित मिळकतीबाबत असल्याने सदर मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तींचे हक्क निर्माण झाल्यास दाव्यात क्लीष्ठ प्रश्न निर्माण होऊन गुंतागुंत निर्माण होऊ शकते. तसे झाल्यास दाव्याच्या मुळ हेतुला धक्का बसेल व दावा अर्थहीन होईल. सबब अशा परिस्थीतीत वादीला प्रतिवादी क्र.१ पासून ते हजर होईपर्यंत अंतरीम कायदेशीर संरक्षण देणे योग्य राहील. सबब वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. ~~वादी~~ प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीमध्ये कोणतेही त्रयस्थ हक्क व अधिकार निर्माण करू नये तसेच दावा मिळकतीच्या स्वरूपात विनापरवानगी कोणतेही बदल करू नये तसेच वादीच्या संयुक्त ताब्यात कोणताही अडीअडथळा कोणत्याही प्रकारे करू नये. वादीने दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश ३९ नियम ३ चे अनुपालन करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRIYANKA VISHVAKANT SHINDE
Date: 2026.07.16 17:31:17 +0530

Shinde
16/07/2026
७वे सह दिवाणी न्यायाधीश
क-स्तर, जालना.

Scanned with CamScanner